**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना २०१८-१९ मध्ये राज्यात राबविण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः शेअवि-२०१८/प्र.क्र.१९३/११-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २० मार्च, २०१९

वाचा :-
१. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१८/प्र.क्र.१९३/११-अे, दि.०१.१२.२०१८

**शासन शुध्दीपत्रक :-**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१८-१९ या वर्षामध्ये राबविण्याबाबत उपरोक्त संदर्भान्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि, सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २, ५ व ७ मध्ये अंशत: सुधारणा करण्यात येत असून, सदर परिच्छेद खालीलप्रमाणे वाचण्यात यावेत :-

१) तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१८-१९ या वर्षामध्ये राबविण्यासाठी जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि. या विमा सल्लागार कंपनीस सन २०१७-१८ च्या ब्रोकरेज दरामध्ये कोणतीही वाढ न करण्याच्या अटीच्या अधीन, म्हणजेच **रु.७,५६,१८३/-** इतक्या रकमेत पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यास शासनाच्या संदर्भ क्र.६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२) सन २०१८-१९ मध्ये विमा हप्ता रकमेचे विमा कंपनीला प्रदान झाल्यापासून १२ महिने इतक्या कालावधीकरिता राज्यातील सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांना विविध अपघातांपासून संरक्षण देण्यासाठी विमा कंपनीला विमा सल्लागार कंपनीस अदा करावयाची विमा हप्ता रक्कम व **सुधारीत विमा ब्रोकरेज रक्कम** पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | विमा कंपनीचे नाव | शेतकरी संख्या | ब्रोकरेज सह विमा हप्ता रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | दि.ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. | १,३६,९८,९६५ | ४७,२६,१४,२९३ /- |
| २ | जायका इंशुरन्स ब्रोकरेज प्रा.लि. | १,३६,९८,९६५ | **७,५६,१८३ /-** |
| **एकुण** | | | **४७,३३,७०,४७६ /-** |

१) विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीस वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १२ महिने कालावधीकरिता होणारी एकूण विमा हप्ता व विमा ब्रोकरेज रक्कम रु. **४७,३३,७०,४७६ /-** (रू. सत्तेचाळीस कोटी तेहतीस लाख सत्तर हजार चारशे शहात्तर फक्त) मंजूर करुन वितरित करण्यास सदर आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२) जायका इंशुरन्स ब्रोकरेज प्रा.लि. या विमा सल्लागार विमा कंपनीस परिच्छेद क्र. २ मधील तक्त्यात नमूद केल्यानुसार सुधारीत दराने **७,५६,१८३ /-** इतकी रक्कम द्यावयाची असून, यापैकी रु. ६,९५,९०७/- इतकी रक्कम यापूर्वीच संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वितरीत

करण्यात आली असल्याने आता उर्वरीत असलेली रु.६०,२७६/- (रु.साठ हजार दोनशे शहात्तर रुपये) इतकी रक्कम वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३) यावरील खर्च "मागणी क्रमांक डी-३, २४०१-पीक संवर्धन, ११०- पीक विमा, (००) (०६) शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक अपघात विमा योजना (२४०१ ४४२७), राज्य योजना, ३३-अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४) प्रस्तुत प्रयोजनासाठी कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी, तसेच, सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम कोषागारातून काढून रेखांकित धनादेश/दर्शनी धनाकर्षाव्दारे अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्राद्वारे विमा सल्लागार कंपनीस अदा करण्यात यावी.

५) प्रस्तुत शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेताक २०१९०३२०१७०२३६२७०१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.03.20 17:12:16 +05'30'

**( डॉ.किरण पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
५) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
६) मा.राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
७) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
८) सर्व मा.विधानसभा सदस्य
९) सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१०) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
११) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२) अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

१६) प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१७) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती ) प्रसिध्दीच्या विनंतीसह
१९) सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
२०) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२५) सर्व जिल्हा परिषदांचे, जिल्हा कृषि विकास अधिकारी
२६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा ), मुंबई.
२७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई
२८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा ), नागपूर
२९) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
३३) दि.ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि.,मे.फेअर टॉवर, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे ५
३४) जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि., नागपूर
३५) ग्रंथालय प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
३६) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-
३७) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३८) सर्व तहसिलदार
३९) सर्व उप विभागीय कृषि अधिकारी
४०) सर्व तालुका कृषि अधिकारी
४१) सर्व उपसचिव /अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४२) सर्व मंत्रालयीन विभाग
४३) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांची मध्यवर्ती कार्यालये
४४) निवड नस्ती, कार्यासन ११-अे.